IIPIMRJ
IIP
International Multidisciplinary Research Journal

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 03 No. Issue I, (January-March) (2026)
Impact Factor: GSRD-IF: 5.001
ISSN: 3049-2734 (Online)

# “एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रात ख्रिस्ती मिशनरी शिक्षणाचा प्रभाव: सामाजिक-सांस्कृतिक स्थित्यंतराचा अभ्यास”

**शिवम बच्छाव (एम.ए.)**

**Article Info**

***Article History:***
Received: 24th January 2026
Accepted: 01st February 2026
Published: 05th February 2026

***Keywords:***

*ख्रिस्ती मिशनरी*

**ABSTRACT**

महाराष्ट्रीय समाजाला ख्रिस्ती धर्माचा परिचय सोळाव्या शतकापासून होता. स्कॉटिश मिशनरी जेम्स मरी मिचेल १८३८ मध्ये भारतात आल्याबरोबर वसईला गेला होता; तेव्हा त्याला तिथे २०,००० ख्रिस्ती धर्मांतरित लोक राहत असल्याचे दिसले. पंचवीसहून अधिक चर्चेस तिथे होती पण बहुतेक सगळे पडझड झालेली आणि कोणीही धर्मप्रसार करत नव्हते. मुंबई आणि वसई हा परिसर मुळात पोर्तुगीजांकडे असल्याने येथे कॅथलिक ख्रिश्चन लोकांचे प्रमाण भरपूर होते.
त्यानंतर मुंबईमध्ये एकोणीसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकात प्रोटेस्टंट मिशनरी आले. अमेरिकेहून पाच मिशनरी १८१२ मध्ये कलकत्त्याला आले. या काळात ब्रिटिश पार्लमेंट कडूनच ख्रिस्ती मिशनऱ्यांनी भारतात धर्मप्रसार करण्यावर बंदी होती. १८१३ चा चार्टर जारी करण्यासाठी इंग्लंडमधील मिशनरी व त्यांचे सहानुभूतीदार लोक यांनी सरकारवर दबाव आणून भारतातील ख्रिस्ती धर्मप्रसारासंबंधी अनुकूल निर्णय घडवून आणण्यासाठी भरपूर प्रयत्न चालवले होते. त्याला यश येऊन १८१३ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीच्या ताब्यात असलेल्या भारतीय प्रदेशात धर्मप्रसार करण्यास मिशनऱ्यांना परवानगी मिळाली. हॉल व नॉट यांनी मुंबईमध्ये काम सुरू केले. पाठोपाठ १८२० मध्ये रेव्हरंड कॅनेडी हा लंडन चर्च मिशनरी सोसायटीचा प्रतिनिधी म्हणून मुंबईत आला आणि १८२२ ते १८२४ या काळात स्कॉटिश मिशनरी मुंबईला दाखल झाले. सतराव्या शतकातील पोर्तुगीज मिशनऱ्यांपेक्षा हे मिशनरी वेगळे होते ते कॅथलिक पंथाशी संघर्ष करणाऱ्या सुधारणावादी प्रोटेस्टंट पंथाचे अनुयायी होते.

***Plagiarism Check Report:***
Tool Used: Turnitin
Date of Report: February 02, 2026
Similarity Index: 5%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2026 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite: Bachchav, S. (2026).** एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रात ख्रिस्ती मिशनरी शिक्षणाचा प्रभाव: सामाजिक-सांस्कृतिक स्थित्यंतराचा अभ्यास. *IIP: International Multidisciplinary Research Journal (IIPIMRJ), 3(1), 829–833.*

महाराष्ट्रीय समाजाला ख्रिस्ती धर्माचा परिचय सोळाव्या शतकापासून होता. स्कॉटिश मिशनरी जेम्स मरी मिचेल १८३८ मध्ये भारतात आल्याबरोबर वसईला गेला होता; तेव्हा त्याला तिथे २०,००० ख्रिस्ती धर्मांतरित लोक राहत असल्याचे दिसले. पंचवीसहून अधिक चर्चेस तिथे होती पण बहुतेक सगळे पडझड झालेली आणि कोणीही धर्मप्रसार करत नव्हते. मुंबई आणि वसई हा परिसर मुळात पोर्तुगीजांकडे असल्याने येथे कॅथलिक ख्रिश्चन लोकांचे प्रमाण भरपूर होते.[1]

त्यानंतर मुंबईमध्ये एकोणीसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकात प्रोटेस्टंट मिशनरी आले. अमेरिकेहून पाच मिशनरी १८१२ मध्ये कलकत्त्याला आले. या काळात ब्रिटिश पार्लमेंट कडूनच ख्रिस्ती मिशनऱ्यांनी भारतात धर्मप्रसार करण्यावर बंदी होती. १८१३ चा चार्टर जारी करण्यासाठी इंग्लंडमधील मिशनरी व त्यांचे सहानुभूतीदार लोक यांनी सरकारवर दबाव आणून भारतातील ख्रिस्ती धर्मप्रसारासंबंधी अनुकूल निर्णय घडवून आणण्यासाठी भरपूर प्रयत्न चालवले होते. त्याला यश येऊन १८१३ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीच्या ताब्यात असलेल्या भारतीय प्रदेशात धर्मप्रसार करण्यास मिशनऱ्यांना परवानगी मिळाली. हॉल व नॉट यांनी मुंबईमध्ये काम सुरू केले. पाठोपाठ १८२० मध्ये रेव्हरंड कॅनेडी हा लंडन चर्च मिशनरी सोसायटीचा प्रतिनिधी म्हणून मुंबईत आला आणि १८२२ ते १८२४ या काळात स्कॉटिश मिशनरी मुंबईला दाखल झाले. सतराव्या शतकातील पोर्तुगीज मिशनऱ्यांपेक्षा हे मिशनरी वेगळे होते ते कॅथलिक पंथाशी संघर्ष करणाऱ्या सुधारणावादी प्रोटेस्टंट पंथाचे अनुयायी होते.

मुंबईत अमेरिकन मिशनरी आधीपासून काम करत असल्याने पुण्यासारख्या ब्राह्मणांच्या केंद्र असलेल्या शहरांमध्ये जाऊन ख्रिस्ती धर्मप्रसाराचे कार्य करावे अशी इच्छा स्कॉटिश मिशनरीची देखील होती. परंतु मुंबई सरकारने स्कॉटिश मिशनला देखील धर्मप्रसारासाठी पुण्यात जाण्याची परवानगी दिली नाही. म्हणून स्कॉटिश मिशनने कोकणात हर्णे आणि बाणकोट येथे आपली केंद्र सुरू केली. पुढे १८३१ मध्ये स्कॉटिश मिशनचे कार्य पुण्यात सुरू झाले. जेम्स मीचेल आणि डॉ. स्टीव्हन्सन हे मुंबईतले दोन मिशनरी पुण्यात राहून धर्मप्रसार करू लागले. १८४४ च्या अखेरीस स्टीफन हिस्लॉप या मिशनऱ्याने नागपूर येथे स्कॉटिश मिशनची शाखा सुरू केली

मुंबई सरकारचे मिशनऱ्यांशी संबंध चांगले राहिले. गव्हर्नर माउंटस्टुअर्ट एलफिन्स्टन याने त्यांना धर्मप्रसारासाठी पुस्तके भेट दिली. वार्षिक 400 रुपये अनुदान त्याने या मिशनरी कार्यासाठी सुरू केले. नंतरचा गव्हर्नर जॉन मालकम यांनीही मिशनऱ्यांना सढळ हाताने मदत केली. मुंबईतील सर्वसामान्य युरोपीय लोकांकडून या मिशनऱ्यांना फारसे प्रोत्साहन अथवा सहानुभूती मिळाली नाही असे मरी मिचेल म्हणतो. मिशनऱ्यांची कामाची पद्धत वेगळी होती: मराठी भाषा शिकून बायबल व इतर ख्रिस्ती साहित्याचा मराठीत अनुवाद करणे व छापणे; ख्रिस्ती छापलेल्या साहित्याचा व ख्रिस्ती धर्माचा गाणी, प्रवचने यांद्वारे सर्वत्र फिरून प्रचार करणे. व इथल्या लोकांच्या शिक्षणासाठी शाळा चालवणे. ख्रिस्ती धर्माचा प्रचार करत असतानाच मिशनऱ्यांनी हिंदू धर्माची तत्वे, हिंदू देवताकारण, कर्मकांड, इत्यादींचा ही बारकाईने अभ्यास केला. ज्या धर्मावर टीका करायची त्याचे सर्वस्वी ज्ञान आपल्याला असले पाहिजे असा त्यांचा प्रयत्न होता. मरी मिचेल याने जालना – बीड – करमाळा– इंदापूर –पुणे असा प्रवास केला. या प्रवासात पैठणला त्याला आढळले की या हिंदू धर्माच्या प्रमुख केंद्रात त्याच्याही पूर्वी काही मिशनरी येऊन गेले आहेत. या उलट पैठण पासून २०० मैल पूर्वेकडे मरी मिचेल ज्या गावांमध्ये फिरला तिथे मात्र ख्रिस्ती धर्माचे नावही कोणी ऐकलेले नव्हते. हिंदू लोकांमध्ये मूर्ती पूजेला अतिशय महत्त्व आहे, आत्मा हा परमात्म्याचा अंश आहे अशी लोकांची पक्की श्रद्धा आहे, असे आपल्याला दिसल्याचे मरी मीचेल लिहितो.

महाराष्ट्रात प्रोटेस्टंट पंथीयांची ख्रिस्ती धर्म प्रसार करण्याची रीत देखील पंधराव्या शतकातल्या पोर्तुगीज कॅथलिकांप्रमाणे जुलमी रक्तपाताची नसून प्रेमाने जिंकून घेण्याची होती. एवढेच नव्हे, तर मुंबईमध्ये 'बॉम्बे असोसिएशन' ,'स्टुडन्ट लिटररी सोसायटी' अशा सामाजिक क्षेत्रात आधुनिक मूल्य पुरवणाऱ्या संस्था स्थापन करण्याच्या कामात अनेक इंग्रज विद्वान, प्राध्यापक, पत्रकार यांनी पुढाकार घेऊन नवशिक्षित महाराष्ट्रीयन पुढाऱ्यांना प्रेरित केले. अशा अनेक धोरणे, कृती यांमधून इंग्रज समाजाची महाराष्ट्रीय समाजाशी आपलेपणाने जुळवून घेण्याची वृत्ती दिसून येते. अर्थात हे वसाहतवादाचेच एक अधिक 'सभ्य' रूप होते, हे उघड आहे.

मेकॉलेने बंगालच्या संदर्भात केलेल्या पुढील विधानावरून हे स्पष्टपणे दिसून येते:

"The effect of this education on the Hindus is prodigious. No Hindoo, who had received an English education, ever remains sincerely attached to his religion. Some continue to profess it as a matter of policy, but many profess themselves pure deists and some embrace Christianity. It is my firm belief that if our plans of education are followed up, there will not be a single idolater among the respectable classes in Bengal thirty years hence. And this will be affected without any efforts to proselytise; without the

[1] Mitchell J. Murry (1899): In Western India: Recollections of My Early Missionary Life, Edinburgh: David Douglas. Page no. 38

smallest interference with religious liberty: merely the natural operation of knowledge and reflection."[2]

भारतात १८५३ मध्ये रेल्वे सुरू झाल्यानंतर दळणवळणाला गती प्राप्त झाली. दळणवळणाची आणि संपर्काची नवी साधने महाराष्ट्रीय समाजात अवतरल्यानंतर या समाजात झालेल्या परिवर्तनाकडे दोन्ही अंगांनी पाहिले पाहिजे, एक तर मुंबईसारख्या नव्याने आकाराला येत असलेल्या कॉस्मोपॉलिटन शहराचा संपर्क समुद्र मार्गाने जाणारी वेगवान जहाजे, तारायंत्र, यांच्याद्वारे पाश्चात्य जगाशी अधिक जवळकीने प्रस्थापित झाला. जहाजांनी येणारी वर्तमानपत्रे आणि पुस्तके यांच्याद्वारे नवे विज्ञान, आणि तत्त्वज्ञान ऐतदेशीयांपर्यंत येऊन पोहोचले. रेल्वे, ट्राम, तार या नव्या तंत्रज्ञानावर आधारित सेवा युरोपमध्ये उदयाला आल्यानंतर मोजक्या वर्षातच महाराष्ट्रात येऊन पोहोचल्या; यावरून युरोपीय आधुनिकतेला समकालीन होण्याची महाराष्ट्रीय समाजाची प्रक्रिया किती वेगाने सुरू झाली होती हे ध्यानात येते.

परिवर्तनाचे दुसरे अंग समाज अंतर्गत होते. महाराष्ट्राच्या दूरदूरच्या प्रदेशात लोकांचा केवळ प्रवास वाढला नाही. तर या दूर दूरच्या प्रदेशात लोकांतला संपर्क वाढला आणि स्थलांतर मोठ्या प्रमाणात वाढले. यामागे दोन कारणे प्रमुख होती: एक म्हणजे नव्या व्यवस्थेमुळे पारंपारिक रोजगार व्यवसायांमध्ये झालेली मोठी उलथापालथ. आणि दुसरे, नव्या शिक्षणामुळे रोजगार-व्यवसायाच्या निर्माण झालेल्या नव्या संधी.

शिक्षण आणि नव्या रोजगाराच्या संधी यांमुळे येथील नवा मध्यमवर्ग उदयास आला. शहरात शिक्षणामुळे आधुनिक विद्यांचे ज्ञान मिळाले, नोकऱ्या मिळाल्या. शिक्षणासाठी लोक खेड्यातून शहराकडे येऊ लागले. खेड्यातून शहराकडे स्थलांतर करताना लोक आपल्या जातीचा एकच व्यवसाय न करता आणि जातीच्या वस्त्यांच्या तुलनेत शहरातले व्यवसाय आणि वस्त्यांमध्ये बहु जातीय समाज हळूहळू दिसू लागला. मिशनऱ्यांच्या शाळांमध्ये सर्व जातीय मुले दिसू लागले याचे एक उदाहरण म्हणजे –बाबा पद्मनजींचे बालपण एकोणिसाव्या शतकाच्या चौथ्या दशकात बीड गावात गेले. त्यांनी बेळगावातल्या ते राहत असलेल्या वसाहतीचे वर्णन पुढील प्रमाणे केले आहे– "आमच्या गल्लीत ब्राह्मणांची वस्ती फार होती; त्यात उपाध्ये, जोशी, पुराणिक, हरदास, भटभिक्षुक, सराफ, वैद्य, पुजारी हे होते. कोर्टाचे मुनसफ व संस्थानिकांचे वकील, कलेक्टर साहेबांचे दिवाण (दफ्तरदार), मामलेदार, खजिनदार, मुंशी, चिटणीस, कारकून, इंजनेर खात्याचे सरवेयर असे मोठे मोठे सरकारी कामगारही राहत असत." यावरून असे दिसते की ही नव्याने तयार झालेल्या मध्यम वर्गाची वस्ती होती ज्यात बहुजातीय लोक एकत्र एका वसाहतीत राहताना दिसतात.[3]

शिक्षण घेणारा, नव्या नोकऱ्या मिळवणारा हा समाज आधुनिक मूल्य व्यवस्थेशी, प्रबोधनाच्या विचारांशी परिचित होऊ लागलेला असला तरी त्याची रूढीग्रस्त मानसिकता आणि कालबाह्य समजुती यांच्यात फारसा बदल झालेला दिसत नाही. ग्रामीण समाज तर पारंपारिक समाजच होता. पण एकोणिसाव्या शतकातला शहरी मध्यमवर्गीय समाजही पारंपारिक पद्धतीने जगताना दिसतो. पद्मनजींचे वडील सरकारी नोकरीत होते आणि ब्राह्मणांच्या घरात भाड्याने राहत असले तरी ब्राह्मणाच्या विहिरीवर पाणी भरण्याचा त्यांना अधिकार नव्हता. पद्मनजींच्या घरी ब्राह्मण स्त्रिया हळदी कुंकवाला येत नसत. बाबा पद्मनजी ब्राह्मणांच्या घरी जेवायला गेल्यास त्यांची जेवणाची जागा जेवणानंतर सारवून स्वच्छ करावी लागे.[4]

ब्राह्मणांकडून जातीय विषमतेचा असा अनुभव घेणाऱ्या पद्मनजी कुटुंबीयांचा व्यवहार त्यांच्याहून खालच्या मानल्या जाणाऱ्या जातीतल्या लोकांशी तितकाच विषमतेचा होता. बाबा पद्मनजींच्या बेळगावच्या मिशनरी शाळेत ब्राह्मण, शेणवी, सोनार, तेली, धोबी, लोहार,सुतार, चांभार, ख्रिस्ती(गोवेकर), जीनगर, हजाम, कोष्टी, कोमेटी, रजपूत, कलाल, इत्यादी जातीजमाती – धर्मांचे विद्यार्थी शिक्षण घेत असत.

या सामाजिक संक्रमणाच्या काळात इतर जातीतील लोकांच्या शिक्षणाला उच्चवर्णीय लोकांकडून विरोध होताना दिसतो.

१८२८ च्या सुमारास नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या संचालकांपैकी एक असलेल्या धाकजी दादाजी या उच्चवर्णीय प्रभू जातीतील गृहस्थानी बरेच प्रयत्न करून 'शूद्रांना शाळेत प्रवेश देण्यात येऊ नये', असा ठराव मंजूर करून घेतला होता.

धाकजी दादाजी हे त्या वेळचे प्रतिष्ठित गृहस्थ होते. त्यांचे असे म्हणणे होते की 'जर हे हलक्या जातीचे लोक शिकून पुढे हुशार झाले तर उंच जातीच्या लोकात इंग्रेजीत रोजगार मिळणार नाही, व त्यांची आपली बरोबरी होत जाईल' या निर्णयावरून हिंदू लोकांमध्ये त्यांची बरीच वाहवा झाली. इंग्रजी सरकारी शाळांमधील व ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या शाळेतील पुस्तकांमध्ये भूगोलाविषयीचे तथ्य

---

[2] प्रियोळकर अ. का. (१९७१) डॉक्टर भाऊ दाजी व्यक्ति, काल व कर्तृत्व, मुंबई : मुंबई मराठी साहित्य संघ, पृष्ठ १९७

[3] वरखेडे रमेश (२०१८), महाराष्ट्राच्या सामाजिक-सांस्कृतिक स्थित्यंतरांचा इतिहास खंड १, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई पृष्ठ ५५१.

[4] तत्रैव, ५५३.

आणि नवे संस्कारित ज्ञान येथील महाराष्ट्रीय पुराणमतवादी असलेले शिक्षक यांच्या पुराणातल्या पौराणिक आणि अतिशयोक्ती पूर्ण माहिती यामुळे ज्ञान प्राप्ती मध्ये मोठा अडसर होता.

दादोबा पांडुरंग यांनी एज्युकेशन बोर्डाच्या अहवालात केलेल्या उल्लेखानुसार–शाळेत शिकवणाऱ्या अनेक शिक्षकांचा देखील ते शिकवत असलेल्या नव्या ज्ञानावर विश्वास नव्हता. पुराणांमध्ये असलेल्या ज्ञानाप्रमाणे शालेय अभ्यासक्रमातील ज्ञान नाही म्हणून या शिक्षणाची निंदा ते करीत. सुरत मधील शाळेतील एक शिक्षक प्राणशंकर याचे उदाहरण बघता ही गोष्ट लक्षात येते . प्राणशंकर हा मुलांना म्हणे की "साहेब परीक्षा घेण्यास आला आणि विचारले तर त्याला सांगा की पृथ्वी गोल आहे आणि फिरते आहे; परंतु या गोष्टीवर विश्वास ठेवू नका कारण जर पृथ्वी गोल असती आणि फिरती तर आपले घर पडले असते ते पडत नाही यावरून ही गोष्ट खोटी आहे" एकोणिसाव्या शतकात जाती बहिष्कृत करण्यापेक्षा प्रायश्चिताचा तोडगा रूढ झालेला किंवा त्याच्या प्रमाणात वाढ झालेली दिसते. शेकडो वर्षांपासून हिंदू समाजात समुद्राचे उल्लंघन करणे निशिद्ध मानले जात होते. परंतु इंग्रजी राज्याच्या स्थापनेनंतर समुद्र ओलांडून सिंध, मध्य आशियाचे आखात आणि त्याही पलीकडे युरोपीय देश येथे शिक्षण, नोकरी, व्यवसाय यांच्या निमित्ताने जाणे येणे फार दिवस टाळता येण्यासारखे नव्हते. १८७२ साली पेशवाई मध्ये रघुनाथराव पेशव्याचा मूळ राजापूरचा असलेला ब्राह्मण वकील हनुमंतराव आणि मनियार हा पारशी गृहस्थ लंडनला जाऊन परत आले. मात्र हनुमंत रावाला त्याच्या स्वजातीत प्रवेश मिळाला नाही अखेर त्याला महाराष्ट्र सोडून भडोचला परागंदा व्हावे लागले.[5] करसंदास मुळशी हे धनाढ्य व्यापारी विलायतेहून परत आल्यावर त्यांच्यावर स्वजातीयांनी बहिष्कार घातला तेव्हा त्यांना त्यातून सोडवण्यासाठी रावसाहेब मंडलिक यांनी खूप प्रयत्न केले. वाणी लोकांची सभा भरवून करसंदास यांचे कृत्य धर्मबाह्य नाही असे त्यांनी पटवून दिले. परिणामी करसंदास मुळजींवर पडलेल्या बहिष्काराचे स्वरूप हळूहळू कमी होत जाऊन काही काळाने ते पूर्ण नाहीसे झाले.

एकोणिसाव्या शतकात इंग्रजांचे राज्य स्थापन झाल्यानंतरच्या पहिल्या–दुसऱ्या पिढीतील मुंबईतील बहुतेक नवशिक्षित मंडळी एक तर मिशनरी शाळांमध्ये शिकून तयार झाली होती किंवा ख्रिस्ती शिक्षक, आणि ज्ञानाचा परिणाम झाला होता. ही मंडळी मध्यमवर्गीय होती. वेगवेगळ्या क्षेत्रात त्या काळातल्या समाजाची अग्रणी होती. यांना ख्रिस्ती धर्मात घ्यावे अशी मिशनऱ्यांची इच्छा असणारच. या लोकांनी एकोणिसाव्या शतकातील नव्या संस्कृतीच्या जडणघडणीत मोलाची भर घातली पण वरीलपैकी बाबा पदमनजी वगळता अन्य कोणीही ख्रिस्ती धर्म स्वीकारला नाही. या सामाजिक स्थित्यंतराच्या व संक्रमणाच्या काळात बुद्धिजीवी मध्यमवर्ग यांच्यामध्ये वैचारिक पातळीवर पुढारलेपण दिसते. मिशनऱ्यांनी ऐतदेशीय लोकांचे ख्रिस्ती धर्माकडे मन वळवण्याचे व धर्मांतरण करण्याचे खूप प्रयत्न केले श्रीपत शेषाद्री व नारायण शेषाद्री धर्मांतर प्रकरणी महाराष्ट्रीय समाजात एक नवीन खळबळ तयार झालेली दिसते. ब्राह्मण आणि सुधारणावादी ब्राह्मण असे दोन गट पडलेले आपल्याला दिसतात. ख्रिस्ती मिशनरी चळवळी विरुद्ध प्रतिवादाच्या प्रयत्नात बाळशास्त्री जांभेकर, विष्णुबुवा ब्रह्मचारी ही लोक अग्रणी राहिलेली दिसतात. हा सुधारणावाद सुरुवातीला ख्रिस्ती मिशनऱ्यानविरुद्ध प्रतिवादाने सुरू झालेला पाहायला मिळतो.[6]

**निष्कर्ष:**

महाराष्ट्र समाजात एकोणिसाव्या शतकात घडून आलेल्या सांस्कृतिक स्थित्यंतर आणि या काळात समाजात मध्यमवर्गाच्या उदयाची प्रक्रिया आणि नवमूल्य स्थापनेची प्रक्रिया ही एकाच वेळी सुरू झाली. पाश्चात्य शिक्षणाचा व ख्रिस्ती मिशनरी शिक्षण चळवळीचा येथील भौतिक जीवनावर पडलेल्या प्रभावातून या समाजात मध्यमवर्गाचा उदय झाला. परंतु याच कारणामुळे येथे मध्यमवर्गाचा उदय झाला असे पूर्णपणे म्हणता येणार नाही. आधुनिकतापूर्व काळात महाराष्ट्रीय समाज हा भारतीय समाजाप्रमाणे जाती व धर्म यांच्यामध्ये विखंडित झालेला होता .शिक्षणानंतरही हा समाज तसाच विखंडित राहिला. असे असले तरी जसा अधिक समाज समूह शिक्षण घेत गेला मुख्य प्रवाहात येत गेले आणि नवनव्या विचारांशी त्यांचा परिचय होत गेला. तसतसा वैचारिक आणि सामाजिक जीवनात परिवर्तन प्रवाहात अधिक वाढ होत गेली. अनेक प्रबोधनवादी चळवळींनी या समाजाला आकार देण्याचे काम केले. परमहंस सभा, प्रार्थना समाज, सत्यशोधक समाज या संस्थां या कार्यात अग्रणी राहिल्या. विसाव्या शतकात महाराष्ट्रीय समाज समाजकारण आणि राजकारणात पुढे आला त्याची पायाभरणी याच काळात झाली.

[5] सरदेसाई गो. स. (१९५६): माझी संसारयात्रा, मुंबई: केशव भिकाजी ढवळे पृष्ठ ७७.

[6] वाळिंबे रा. शं. (१९६२): एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्राची सामाजिक पुनर्घटना, भाग पहिला (१८००-१८४५), पुणे: जोशी-लोखंडे प्रकाशन, पृष्ठ १८२-१९०.

**संदर्भ सूची**

मराठी:
१. प्रियोळकर अ. का. (१९७१) डॉक्टर भाऊ दाजी व्यक्ति, काल व कर्तृत्व, मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई.
२. वरखेडे रमेश (२०१८), महाराष्ट्राच्या सामाजिक-सांस्कृतिक स्थित्यंतरांचा इतिहास खंड १, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई
३. वाळिंबे रा. शं. (१९६२): एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्राची सामाजिक पुनर्घटना, भाग पहिला (१८००-१८४५), जोशी-लोखंडे प्रकाशन, पुणे.
४. सरदेसाई गो. स. (१९५६): माझी संसारयात्रा, केशव भिकाजी ढवळे, मुंबई.

इंग्रजी:
Mitchell J. Murry (1899): In Western India: Recollections of My Early Missionary Life, Edinburgh: David Douglas.